
GLOBALLY INDEXED 5.403

SRJIS

Online ISSN -2278-8808
Printed ISSN- 2319-4766




An International Peer Reviewed

Referred Quarterly

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

SPECIAL ISSUE JAN-MAR, 2017. VOL. 6, ISSUE -24

EDITOR IN CHIEF : YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph.D.

26 ROLE OF GRAMPANCHAYAT IN ECONOMIC DEVELOPMENT
*Dr. Rajendra Bhosale , Kadlag Suvarna Uttamrao (118-121)*

27 भारतीय शेती वित्त पुरवठा
*प्रा. डॉ. एस. जी. वैदय , प्रा.सादिक बशीर सय्यद (122-125)*

28 समाजकल्याण विभागाअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनांचे झालेले आर्थिक व सामाजिक परीणाम - अहमदनगर जिल्हा परिषदेचा विशेष अभ्यास
*प्रा. डॉ. एस. जी. वैदय , कविता होन (126-128)*

29 रायगड जिल्हयातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा चिकित्सक अभ्यास
*प्रा. डॉ. सुहास आव्हाड , कान्हु शेजूळ (129-132)*

30 कृषी विक्रीव्यवस्थेतील फळविक्रत्यांची भूमिका
*प्रा. डॉ. आर. डी. भोसले , खांडरे स्वप्नाली रमेश (133-135)*

31 विशेष आर्थिक क्षेत्र
*प्रा. डॉ. एस. जी. वैदय , गव्हाणे दत्तात्रय धनू (136-140)*

32 STUDY OF DIFFERENT DISABILITY WELFARE SCHEMES IMPLEMENTED BY GOVERNMENT OF MAHARASHTRA
*Dr. Sunil Ugale, Miss. Shaikh Nilofar Anwar (141-143)*

33 मुस्लिम समाजाच्या आर्थिक - सामाजिक विकासावर झालेल्या परिणामांचा व्यष्टी अभ्यास
*प्रा. डॉ. विजयकुमार वावळे , शायिन यासिन शेख (144-148)*

34 दुष्काळावर जलसंजीवनी : जलयुक्त शिवार
*प्रा. डॉ. संभाजी भाऊराव काळे , श्री. बाळासाहेब जयराम जाधव (149-152)*

35 महाराष्ट्र राज्यातील वाढत्या लोकसंख्येला रोजगार पुरविण्यात पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाची भुमिका
*प्रा. डॉ. एल. बी. घोलप , गोरक्ष सुंदर कडवे (153-155)*

36 स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत पाणी पुरवठा करणाऱ्या वाहतुक संस्थांचे चिकित्सक अध्ययन
*प्रा. डॉ. आर. डी. भोसले , वैशाली जिजाबा सोनवणे (156-158)*

37 STUDY OF SOCIAL AND ECONOMICAL PROBLEM FACED BY WORKING WOMEN IN LOCAL GOVERNMENT
*Dr. Pawar A.M. , Swati Purushottam Wagh (159-162)*

38 TYPES OF QUALITATIVE RESEARCH METHODS IN ECONOMICS
*Dr. S.K. Magare , Mr. Sudheer Suresh Dhore (163-168)*

39 अहमदनगर जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाच्या खर्च प्रवृत्तीचा अभ्यास
*प्रा. डॉ. एल. बी. घोलप , तुवर जालिंदर गोरक्षनाथ (169-175)*

*प्रा. डॉ. एस. जी. वैद्य & प्रा.सादिक बशीर सय्यद (122-125)*

# भारतीय शेती वित्त पुरवठा

प्रा. डॉ. एस. जी. वैद्य[१] , प्रा.सादिक बशीर सय्यद[२]

[१] *सहाय्यक प्राध्यापक , अर्थशास्त्र विभाग, आर.बी.एन.बी. महाविद्यालय, श्रीरामपूर*

[२] *पीएच.डी संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर अर्थशास्त्र संशोधन केंद्र, सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर*

## प्रस्तावना :-

जगातील प्राचीन संस्कृतीचा वारसा जपणारा भारत हा क्षेत्रफळाने ७ वा सर्वात मोठा देश आहे. भारताची अर्थव्यवस्था कृषी प्रधान असून शेती हा आर्थिक विकासाचा कणा आहे. भारताची अर्थव्यवस्था ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अवलंबून असल्यामुळे सर्वप्रथम ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणे हे राष्ट्राचे प्रथम कर्तव्य मानले जाते, नव्हे तर कृषी संस्कृती हीच खरी संस्कृतीची जननी आहे. आणि तिचा विकास करणे महत्वाचे आहे.

इतर व्यावसायाप्रमाणेच शेती हा सुध्दा एक व्यवसाय [उद्योग] आहे. त्यामुळे शेती करीता प्रत्ययाची/ऋणाची आवश्यकता आहे. उदयोग व शेती ह्यात फरक असलयामुळे शेतीच्या कर्जाच्या प्रश्नाचा निरनिराळ्या दृष्टिकोनातून विचार करणे आवश्यक ठरते. शेती व्यवसाय हा बहुतांश ग्रामीण भागातच असलयाने शेती करीता होणाऱ्या कर्जपुरवठयाला ग्रामीण कर्ज किंवा कृषी वित्त असेही म्हणतात. भारतातील शेतकऱ्यांना विविध कारणांसाठी कर्जाची आवश्यकता भासते. भारतीय शेतीला होणारा कर्जपुरवठा कितपत आहे, कर्जाचे वितरण कोणत्या पध्दतीने होते, कर्ज वितरणात कोणत्या समस्या आहे. त्या जाणून घेणे हा शोध निबंधाचा प्रमुख हेतू आहे.

## संशोधनाची उद्दिष्टये:-

१] शेतकऱ्यांचे कर्ज घेण्याचे विविध मार्ग अभ्यासणे.

२] संस्थात्मक वित्तपुरवठयाचा विकास जाणून घेणे.

३] शेती पतपुरवठयाच्या समस्या जाणून घेणे.

## संशोधन पध्दती:-

प्रस्तुत संशोधनपर लेख हा द्वितीय आधार सामग्रीवर आधारित असून ही आधार सामग्री संकलित करण्यासाठी प्रामुख्याने भारत सरकार, केंद्रिय सांख्यिकीय संघटन यांनी वेळोवेळी प्रकाशित केलेली माहिती व आकडेवारीचा आधार घेतला आहे. त्याचबरोबर विविध संदर्भग्रंथ, संशोधनपर लेख, मासिके, वेबडेटा इ. चा आधार घेतलेला आहे.

 ISSN 2319-4766

## शेती कर्जपुरवठयाचे विविध मार्ग:-

अल्पकालीन व मध्यमकालीन गरजा भागविण्यासाठी शेतकरी, सावकार, सहकारी कर्ज समित्या व सरकार ह्या पासून कर्ज घेतो. दीर्घकालीन गरजा पूर्ण करण्याकरिता तो सावकार, भूविकास अधिकोष व सरकार ह्यांचेकडून कर्ज घेतो. कोणत्या मार्गाने किती कर्ज घेतले ते खालील तक्त्यात दर्शविले आहे.

### शेतकऱ्यांचे कर्ज घेण्याचे विविध स्त्रोत [टक्केवारी]

| वित्त पुरवठा करणारे स्त्रोत | १९५१ | १९६१ | १९७१ | १९८१ | १९९१ | २००२ |
|---|---|---|---|---|---|---|
| अ] संस्थात्मक स्त्रोत | | | | | | |
| १] सरकार | ३.३ | ५.३ | ६.७ | ४.० | ५.७ | २.३ |
| २] सहकारी समित्या /बँक | ३.१ | ९.१ | २०.१ | २८.६ | १८.६ | २७.३ |
| ३] व्यापारी अधिकोष | ०.८ | ०.४ | २.२ | २८.० | २९.० | २४.५ |
| ४] इतर [विमा, भविष्य निर्वाह निधी व इतर संस्था ] | - | - | ०.२ | ०.६ | १०.७ | ३.० |
| १ ते ४ ची बेरीज | ७.२ | १४.८ | २९.२ | ६१.२ | ६४.० | ५७.१ |
| ब] गैरसंस्थात्मक/खाजगी स्त्रोत | | | | | | |
| ५] सावकार व महाजन | ६९.७ | ६०.९ | ३६.९ | १७.५ | १५.७ | २९.६ |
| ६] व्यापारी | ५.५ | ७.७ | ८.७ | ३.४ | ७.१ | २.६ |
| ७] नातेवाईक व मित्र | १४.२ | ६.८ | १३.८ | ९.० | ६.७ | ७.१ |
| ८] जमिनदार व इतर | ०३.४ | ९.८ | ११.४ | ८.९ | ६.५ | ३.६ |
| ५ ते ८ ची बेरीज | ९२.८ | ८५.२ | ७०.८ | ३८.८ | ३६.० | ४२.९ |
| एकूण बेरीज [अ + ब] | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |

**Source Reserve Bank of India, All credit survey committee Report, 1951-52.**

वरील तक्त्यावरुन स्पष्ट होते की, १९५१-५२ मध्ये ग्रामीण कर्जाचा सर्वात मोठा स्त्रोत सावकार व महाजन होता. एकूण कर्जापैकी ६९.७ टक्के कर्ज पुरविण्यात येत होते. परंतु ह्यांचा कर्जातील हिस्सा सतत कमी होत जावून २००२ मध्ये २९.६ टक्के झाला. तसेच अन्य गैरसंस्थात्मक स्त्रोतांचा [खाजगी स्त्रोतांचा ] १९५१-५२ मध्ये २३ टक्के हिस्सा होता तो घटत जावून २००२ मध्ये १३.३ टक्के झाला. १५५१-५२ मध्ये गैरसंस्थागत स्त्रोतांपासून मिळणाऱ्या कर्जाचे प्रमाण ९२.८ टक्के होते ते घटत जावून २००२ मध्ये ४२.९ टक्के झाले. संस्थात्मक कर्जाचे प्रमाण १९५१-५२ मध्ये ७.२ टक्के होते. ते वाढत जावून २००२ मध्ये ५७.१ टक्के झाले. सहकारी समित्याद्वारे होणाऱ्या कर्ज पुरवठयाचे प्रमाण ३.९ टक्के होते ते वाढत जावून २००२ मध्ये २७.३ टक्के झाले. व्यापारी अधिकोषांतर्फे होणाऱ्या कर्ज पुरवठयाचे प्रमाण ०.८ टक्के होते. ते २००२ मध्ये २४.५ टक्के झाले. यावरुन स्पष्ट होते की कृषी वित्ताच्या पुरवठयात आता बराच मोठा भाग सहकारी समित्या व व्यापारी अधिकोषांचा आहे.

 ISSN 2319-4766

## संस्थात्मक कृषि वित्त पुरवठयाचा विकास :-

शेती कर्जपुरवठयाच्या संस्थात्मक स्त्रोतांमध्ये सहकारी बँका, प्रादेशिक बँका, व्यापारी बँका यांनी केलेला कृषी वित्त पुरवठयाचा विकास खालील तक्त्यात दर्शविला आहे.

**संस्थात्मक कृषी वित्त पुरवठयाचा विकास [रु. कोटीत]**

| वर्ष | सहकारी बँका | | प्रादशिक बँका | | व्यापारी बँका | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | टक्के | रु. | टक्के | रु. | टक्के | रु. | टक्के |
| १९९७-९८ | १४०९० | ४४ | २०४० | ६ | १५८३० | ५० | ३१९६० | १०० |
| २००२-०३ | २३७२० | ३४ | ६०७० | ९ | ३९७७० | ५७ | ६९५६० | १०० |
| २००६-०७ | ४२४८० | २१ | २०४०० | १० | १४०३८० | ६९ | २०३३०० | १०० |
| २००७-०८ | ४८२५८ | १९ | २५३१२ | १० | १८१०८८ | ७१ | २५४६५८ | १०० |
| २००८-०९ | ३६७६७ | १३ | २६७२४ | ९ | २२८९५१ | ७८ | २९९३३७ | १०० |
| २००९-१० | ६३४९२ | १७ | ३५२१८ | ९ | २८५७९९ | ७४ | ३८४५१४ | १०० |
| २०१०-११ | -- | -- | -- | -- | -- | -- | ४४७५१४ | १०० |

संदर्भ:- Indian Economy Gauraw Datt & Ashwini Mahajan, 66th Ed.(2012)

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे १९९७-९८ ते २००९-१० या काळात सहकारी बँकाच्या वित्त पुरवठयात रु. १४०९० कोटीवरुन रु ६३४९२ कोटीपर्यत वाढ झाली. परंतु एकूण कृषी वित्तपुरवठयातील त्यांचा वाटा ४४ टक्क्यावरुन १७ टक्क्यापर्यत घटला. तर व्यापारी बँकाच्या कृषी वित्तपुरवठयात रु. १५८३० कोटीवरुन रु. २८५७९९ कोटी वाढ झाली असून एकूण कृषी वित्तपुरवठयातील त्यांचा वाटा ५० टक्क्यावरुन ७४ टक्क्यापर्यत वाढला. सन १९९७-९८ ते सन २००९-१० या काळात प्रादेशिक ग्रामीण बँकाच्या कृषी वित्त पुरवठयात रु. २०४० कोटीवरुन रु.३५२१८ कोटीपर्यंत वाढ झाली असून एकूण कृषी वित्तपुरवठयातील त्यांचा वाटा ६ टक्क्यावरुन ९ टक्क्यापर्यत वाढला आहे. एकंदरीत कृषी वित्तपुरवठयातील सहकारी कृषी वित्तपुरवठयाचे महत्व कमी झाले असून व्यापारी बँकांचे महत्व लक्षणीय वाढले आहे. सन १९९७-९८ ते सन २०१०-११ या कालावधीत संस्थात्मक कृषी वित्त पुरवठयात रु. ३१९६० कोटीवरुन ४४७५१४ कोटीपर्यत लक्षणीय वाढ झाली आहे.

## शेती पतपुरवठयाच्या समस्या:-

१. कर्ज मिळण्याची गुंतागुंतीची पध्दत असल्याने त्यांना माहिति जमविणे अवघड होते.

२. सहकारी बँका व व्यापारी बँका यांच्यात समन्वय नसलयाने समतोल कर्जपुरवठा होत नाही.

३. छोट्या व सीमांत शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष होते.

४. व्यापारी व सहकारी बँकाचे व्यवस्थापन क्षमता नसलेल्या लोकांकडे असलयाने संस्थांच्या कार्यात उणिवा आढळतात व ते स्वत:च्या स्वार्थासाठी कार्य करतात.

५. गुजरात, आंध्रप्रदेश, पंजाब, तामिळनाडू या राज्यांचा एकूण पतपुरवठयातील वाटा ५२ टक्के त्यामुळे प्रादेशिक असमतोल दिसतो.

६. खाजगी संस्थाकडून होणाऱ्या पतपुरवटयाचे प्रमाण मोठे आहे.

७. ग्रामीण भागातील बचतीमधून त्या भागाच्या कर्जविषयक गरजा पूर्ण करणे शक्य होत नाही. त्यासाठी इतर भागातून बचती याभागाकडे वळविण्याची गरज आहे पण त्या वळविलया जात नाही.

## समारोपः-

अशा रितीने भारतीय शेतीला होणारा वित्तपुरवठा, त्यातच संस्थात्मक वित्तपुरवठा विभागाने घातलेली भर व शेती वित्तपुरवठा संबंधात असलेलया समस्या जाणून घेण्यात आलया. यावरुन शेतीचा शाश्वत विकास करण्यासाठी संस्थांत्मक वित्तपुरवठा विभागाने महत्वाची भूमिका बजावण्याची गरज आहे.

## संदर्भ:-

*जी.एन.झामरे- भारतीय अर्थव्यवस्था-पिंपळापुरे ॲन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.*
*रा.क.बर्वे- भारतीय अर्थव्यवस्था आणि महाराष्ट्राच्या आर्थिक समस्या, गाज प्रकाशन, अहमदनगर.*
*आर.के.दातीर - भारतीय अर्थव्यवस्था समस्या आणि भवितव्य, निराली प्रकाशन पुणे.*
*राजेंद्र अ.रसाळ - भारतीय अर्थव्यवस्था समस्या आणि भवितव्य, सक्सेस प्रकाशन, पुणे.*
*अर्थक्रांती- मराठी अर्थशास्त्र परिषद ३८ वे राष्ट्रीय अधिवेशन दिनांक ७,८ व ९ नोव्हेंबर २०१४*
*Economic Survey Govt. of India (2011-12)*
*Agricultural Statistics at a glance Ministry of Agriculture 2010*
*Reserve Bank of India credit survey committee report 1551-52.*